बाप्पा मोरया रे

अल्बम ः गजर एकविरा झाला

गायक ः स्वप्निल बांदोडकर, वैशाली सामंत, अवधूत गुप्ते

गीत ः अश्विनी शेंडे बगवाडकर

संगीतः निलेश मोहरीर

तुझ्या पायी ठेवी माथा दुर होई शिण
तुझ्या माझ्या अंतराची आगळीच विण
तुच सखा सोबती तु जिवीचा जीवा रे
पाहते तुला डोळे भरून गणपती देवा रे
तुच आदी तुच अंत बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे
बाप्पा मोरया मोरया मोरया रे
बाप्पा मोरया मोरया मोरया रे

डोळयातुनी तेज तेवती दिवे अमृताचे
आतला संवाद चाले भान ना जगाचे
विश्वासाने भक्त तुझा आला आहे दारी
रित्या हाती धाडू नको देवा तु माघारी
तुच सखा सोबती तु जिवीचा जीवा रे
पाहतो तुला डोळे भरून गणपती देवा रे
तुच आदी तुच अंत बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे
बाप्पा मोरया मोरया मोरया रे
बाप्पा मोरया मोरया मोरया रे

नाव तुझे ओठांवर कैवल्याचे रूप
भेट होते उराउरी साफल्याचे सुख
वेडी माझी आशा आणि भाबडीच भक्ती
दर्शनात एक तुझ्या सामावली तृप्ती

तुच सखा सोबती तु जिवीचा जीवा रे

पाहतो तुला डोळे भरून गणपती देवा रे

तुच आदी तुच अंत बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे

बाप्पा मोरया मोरया मोरया रे

बाप्पा मोरया मोरया मोरया रे

मागणे हे करते तुझा आधार असु दे

काहीलीत हया रूपाची सावली दिसु दे

तुच आप तेज वायु धरा जल प्रवाही

देह तुझा मन तुझे माझे काही नाही

तुच सखा सोबती तु जिवीचा जीवा रे

पाहते तुला डोळे भरून गणपती देवा रे

तुच आदी तुच अंत बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे बाप्पा मोरया रे

बाप्पा मोरया मोरया मोरया रे

बाप्पा मोरया मोरया मोरया रे